**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धी पत्रक**

- ***संडे गार्डन" — मिरा भाईंदरमध्ये सांस्कृतिक आनंद आणि मनोरंजनाच्या शेवटच्या पर्वाची यशस्वी सांगता**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मा. राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से) यांच्या मार्गदर्शनाखाली "संडे गार्डन" या अनोख्या कार्यक्रमाचे शेवटचे पर्व दिनांक 25 मे 2025 रोजी संध्याकाळी 6.00 वाजता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, आरक्षण क्रमांक 269, कनाकिया, मिरारोड(पूर्व), जेसल पार्क भाईंदर (पूर्व), सालासर हनुमान उद्यान, उड्डाणपुलाजवळ भाईंदर (पश्चिम), आणि आरक्षण क्रमांक 242,रामदेव पार्क मिरारोड (पूर्व), येथे यशस्वी रित्या संपन्न झाले.

संडे गार्डन उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक कलाकारांना तसेच नागरिकांना त्यांच्या कलागुणांना वाव देऊन एक सादरीकरण व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा या मागचा प्रमुख हेतू आहे. या शेवटच्या सत्रात शहरातील नागरिक व स्थानिक कलाकारांनी नृत्य, गायन ,मिमिक्री अशा विविध कला सादर करत संध्याकाळ मनोरंजनात्मक केली.

सालासर हनुमान मंदिर भाईंदर (पश्चिम) येथे संडे गार्डनच्या कार्यक्रमात खरी रंगत आणली ती 14 वर्षीय जादुगार स्वरांग रणदिवे याने. आपल्या जादुई खेळाने सगळ्यांना मंत्रमुग्ध करून टाकणाऱ्या या जादूगाराने नागरिकांचे मनोरंजन तर केलेच त्याचबरोबर उत्तम करमणूक देखील केली.

संडे गार्डन हा उपक्रम मे महिन्यातील प्रत्येक रविवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला आहे. नागरिकांच्या सहभागातूनच मिरा भाईंदरच्या सांस्कृतिक कलागुणांना अधिक चालना मिळणार आहे असा विश्वास मनपा प्रशासनाला असल्याने संडे गार्डन या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, आरक्षण क्रमांक 269, कनाकिया, मिरारोड(पूर्व), जेसल पार्क भाईंदर (पूर्व), सालासर हनुमान उद्यान, उड्डाणपुलाजवळ भाईंदर (पश्चिम), आणि आरक्षण क्रमांक 242,रामदेव पार्क मिरारोड (पूर्व), येथे संपन्न झालेल्या संडे गार्डन च्या शेवटच्या सत्रात मिरा भाईंदर शहरातील नागरिकांनी व कलाकारांनी उस्फूर्तपणे सहभाग घेत हे शेवटचे सत्र पण आधीच्या सत्राप्रमाणे यशस्वी केल्यामुळे मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी मिरा भाईंदर शहरातील नागरिक आणि कलाकारांचे आभार मानले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्या दिल्या.

यावेळी कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, उद्यान अधिक्षक नागेश वीरकर व इतर मनपा अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.